## नियमित दिवाणी दावा क्र.५६८/२०२१ मधील
## निशाणी क्र.१९ वर आदेश

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी हे वेळेमध्ये त्यांची कैफियत दाखल करु शकले नाहीत. तसेच सदर प्रतिवादी विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला नाही, त्यामुळे झालेला विलंब माफ करण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, प्रतिवादी विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला नाही. उभय पक्षकारांतील वाद संपुष्ात येण्यासाठी प्रतिवादीस एक संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

नि.क्र.१९ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by KALIDAS SIDRAM SURYAWANSHI
Date: 2022.05.02 16:44:52 +0530

(के. एस. सुर्यवंशी)

दिनांकः-०२.०५.२०२२ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.